**सौदी अरेबिया मधील मदिनाह येथे भारतीय नागरिकांचा समावेश असलेल्या दुर्दैवी अपघातानंतर भारत सरकारच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाची भेट**

18 नोव्हेंबर 2025

सौदी अरेबियातील मदिनाह जवळ 17 नोव्हेंबर 2025 रोजी भारतीय यात्रेकरुंच्या घडलेल्या दुर्दैवी अपघाताबद्दल भारत सरकारने तीव्र शोक व्यक्त केला आहे. आम्ही मृतांच्या कुटुंबीयांप्रती तीव्र शोक व्यक्त करतो आणि जखमींच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो.

2. सौदी अरेबियातील संबंधित अधिकाऱ्यांशी, विशेषतः हज आणि उमराह मंत्रालयाशी समन्वय साधून पूर्ण क्षमतेने मदत पुरवण्यासाठी आणि मदतकार्य उपाययोजनांची पाहणी आणि समन्वय साधण्यासाठी भारत सरकारच्या उच्च-स्तरीय शिष्टमंडळाची उद्या सौदी अरेबियाला भेट होणार आहे. हे शिष्टमंडळ आंध्र प्रदेशचे माननीय राज्यपाल श्री न्यायमूर्ती एस. अब्दुल नझीर यांच्या नेतृत्वाखाली असेल. त्यांच्या समवेत परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (CPV व OIA) श्री अरुण कुमार चॅटर्जी हे देखील असतील. हे शिष्टमंडळ मृतांच्या अंत्यसंस्कारामध्ये देखील सहभागी होण्याची शक्यता आहे.

3. रियाध स्थित भारतीय दूतावास आणि जेदाह स्थित भारतीय वाणिज्य दूतावास स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून मृतात्मांच्या पार्थिवाची ओळख पटवण्याची प्रक्रिया अधिक जलदगतीने करण्यास कार्यरत आहेत. भारत सरकार मृतात्मांच्या कुटुंबियांच्या सौदी अरेबियाला जाण्याची सोय देखील करून देत आहे. या दुर्घटनेमुळे प्रभावित भारतीय नागरिकांना सहाय्य करण्यासाठी भारत सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे आणि जलद आणि प्रभावी सहाय्य सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध आहे.

**नवी दिल्ली**

18 नोव्हेंबर 2025